दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १६३ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार, दि.१७ एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# प्रवाशांना चांगली सुविधा न देणाऱ्या हॉटेलचे थांबे रद्द करा

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे एसटी प्रशासनाला निर्देश

**मुंबई (वृत्तसंस्था):** लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान एसटी बसेस थांबत असलेल्या हॉटेल-मोटेल थांब्यावर प्रवाशांना आरोग्यदायी आणि किफायतशीर सुविधा मिळत नसतील तर असे थांबे रद्द करण्याचे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत. या संदर्भात सध्या सुरू असलेल्या सर्व थांब्याचे सर्वेक्षण करून त्याचा अहवाल पुढील १५ दिवसात सादर करण्याच्या सूचना देखील त्यांनी एस. टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना केल्या आहेत.लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान एसटी बसेस विविध हॉटेल-मोटेल थांब्यावर थांबतात. तेथे प्रवाशांना चहा -नाष्टा अथवा जेवण तसेच नैसर्गिक विधीसाठी वेळ दिला जातो. परंतु अनेक हॉटेलमधील थांब्या बाबत प्रवाशांच्या तक्रारी येत असून प्रामुख्याने प्रसाधनगृहे अस्वच्छ असणे, फराळाचे जिन्नस शिळे, अशुद्ध व महाग असणे, याचबरोबर संबंधित हॉटेल वरील कर्मचारी व मालकांची वर्तणूक एस. टी. प्रवासांच्या सोबत अत्यंत वाईट असणे अशा प्रकारच्या तक्रारी उद्भवत आहेत. या तक्रारीची गंभीर दखल घेऊन मंत्री सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला याबाबत कडक धोरण स्वीकारण्याची निर्देश दिले आहेत. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता प्रवाशांच्या आरोग्याची कोणती तडजोड न करता संबंधित हॉटेल-मोटेल थांब्यावर कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले आहेत. तसेच सध्या संपूर्ण राज्यभरात सुरू असलेल्या हॉटेल-मोटेल थांब्याचे नव्याने सर्वेक्षण करून तेथील प्रवासी सुविधांची चाचपणी करावी. जे थांबे प्रवाशांना योग्य सुविधा देत नसतील त्यांच्यावर कारवाई करावी व नव्या थांब्यांना मंजुरी द्यावी. तसेच याबाबतचा सविस्तर अहवाल येत्या १५ दिवसात आपल्याला सादर करावा असे निर्देशित त्यांनी दिले आहेत.या संदर्भात सरनाईक म्हणाले की, हॉटेल - मोटेल थांबा यावरून एसटीला मिळणारे उत्पन्न एक वेळ बुडाले तर चालेल, परंतु प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधा बाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता एसटी महामंडळाच्या प्रवाशांना थांबा असलेल्या हॉटेलवर चांगल्या सुविधा मिळतील का? हे पहाणे महत्त्वाचे ठरेल.



## शिवभोजन केंद्रातील बोगस बिले

# लाखों रुपयांचा गंडा उघडकीस;यशवंत पवार यांच्या बेमुदत धरणे आंदोलनाची सुरुवात

**माळशिरस । श्रीकृष्ण देशपांडे**

महाराष्ट्र सरकारने गोरगरीब आणि गरजू लोकांसाठी सुरू केलेली शिवभोजन योजना आता प्रश्नचिन्हाच्या घेरीत आली आहे. सोलापूर शहराच्या परिमंडळ अ विभागातील काही शिवभोजन केंद्रांमध्ये खोटी बिले दाखवून लाखों रुपयांचा गंडा सुरू आहे. सरकारच्या अनुदानावर चोरणाऱ्या केंद्रांमध्ये दोषांचा तडीपार सिलसिला सुरू आहे - स्टील भांडी नसणे, हातमोजे व टोपी न वापरणे, गॅसच्या ऐवजी घरगुती गॅसचा वापर करणे, अन्न न शिजवणे, आणि थाळीचा बोगस फोटो काढून हिशोब घालणे अशी घोटाळ्यांची मालिका काही शिवभोजन केंद्रांमध्ये सुरू आहे.




शिवभोजन केंद्रांची तपासणी करत असताना, परिमंडळ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे, आणि या प्रकरणावर कोणतीही कारवाई झाली नाही. या केंद्रांच्या चालकांनी बोगस बिले दाखवून राज्य सरकारला लाखों रुपयांचा चुना लावला आहे. यावर कठोर कारवाईची आवश्यकता आहे. सोलापूर शहरातील जेष्ठ पत्रकार यशवंत पवार यांनी या गंभीर मुद्द्यावर आवाज उठवला आहे. त्यांनी २८ मार्च २०२५ रोजी अन्न धान्यवितरण अधिकारी सोलापूर शहर यांच्या कडे लेखी तक्रार केली होती, त्यानंतर उपोषणाचा इशारा देत त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय समोर पूनम गेट येथे बेमुदत धरणे आंदोलनास सुरुवात केली आहे.या आंदोलनाच्या माध्यमातून पवार यांनी परिमंडळ अ विभागातील सर्व शिवभोजन केंद्रांची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नेमण्याची आणि दोषी शिवभोजन केंद्रांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# नगरच्या रेल्वेस्थानकासाठी ३१ कोटींचा निधी-खासदार नीलेश लंके यांची माहिती

**पारनेर । गणेश वाघ**

अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत अहिल्यानगर रेल्वे स्थानकाच्या विकासासाठी केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने ३१ कोटी रूपयांचा निधी मंजुर केल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली.

केंद्र शासनाच्या रेल्वेच्या विविध समस्यांवर संसदेत आवाज उठवल्यानंतर, रेल्वे मंत्रालयाने अहिल्यानगर लोकसभा मतदार संघातील रेल्वे स्थानकांच्या विकासाचे कार्य हाती घेतले. यामध्ये स्थानकांचे सुशोभिकरण, उड्डाणपुलांची उभारणी व इतर आवश्यक कामांचा समावेश आहे. खासदार नीलेश लंके यांच्यानुसार, या निधीचा उपयोग रेल्वे स्थानकाचे आधुनिकिकरण, स्थानिक प्रवाशांच्या गरजा, नगर शहराची सांस्कृतिक ओळख आणि भविष्यातील वाहतूक व्यवस्थेचा दृष्टीकोन




विचारात घेऊन करण्यात येईल.अहिल्यानगर रेल्वे स्थानकाच्या विकासामुळे शहराच्या चेहऱ्याची रूपरेषा बदलणार आहे. यापुढे, जागतिक दर्जाच्या सुविधांचा लाभ प्रवाशांना मिळणार आहे. आगामी काळात रेल्वेच्या अतिरिक्त अत्याधुनिक सुविधांसाठी खासदार नीलेश लंके नेहमीच रेल्वेमंत्रालयाशी पाठपुरावा करत राहणार आहेत. लवकरच कामांची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू होईल, असे त्यांनी सांगितले.

# कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी पूर्वतयारी करा-जिल्हाधिकारी डॉ.आशिया

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांना मोठ्या प्रमाणात भाविक भेट देण्याची शक्यता लक्षात घेता गर्दीचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आतापासून नियोजन करावे आणि पर्यटकांसाठी सुविधा निर्माण करण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी केले. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी आयोजित पूर्वतयारी बैठकीत ते बोलत होते. बैठकीला अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, उत्तर प्रदेशात कुंभ निमित्ताने धार्मिक पर्यटनात वाढ झाली आहे. त्यामुळे नाशिक सोबत अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर येथील धार्मिक पर्यटनाला चालना देण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. त्यादृष्टीने धार्मिक स्थळांना जोडणारी वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी रेल्वेस्थानक, रस्ते, विमानतळ सुविधांच्या सुधारणेवर भर द्यावा. पर्यटकांच्या गर्दीचे नियोजन करण्यासाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करावी. आरोग्य सुविधा, सुरक्षा विषयक उपाययोजना, स्वच्छतागृह, प्रमुख रस्ते, परिसर सुशोभीकरण, पोलीस मदत केंद्रे आदी व्यवस्थेचे आतापासून नियोजन करावे. शिर्डी आणि शनीशिंगणापूर परिसरातील रस्त्यांना लागून वाहनतळ तयार करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने जागा निश्चित कराव्या.शिर्डी येथे वाहतूकीला आतापासून शिस्त लागेल अशा उपाययोजना कराव्यात. मेळा कालावधीसाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करावा. येणाऱ्या पर्यटकांना माहिती देण्यासाठी,आवश्यकतेनुसार मदत करण्यासाठी सर्व विभागाचे अधिकारी एका ठिकाणी असतील अशाप्रकारे मदत केंद्र उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावा. प्रमुख धार्मिक स्थळांच्या मार्गांवर सूचना फलक लावण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.मुख्याधिकारी सतीश दिघे यांनी सादरणीकरणाद्वारे सिंहस्थाच्या अनुषंगाने आवश्यक पूर्वतयारीची माहिती दिली.



# खा.लंकेंनी बीएसएनएल अधिकाऱ्यांना धरले धारेवर विविध सुविधांमधील त्रृटींबाबत विचारला जाब

## खा.बजरंग सोनवणे यांचीही उपस्थिती

**पारनेर । गणेश वाघ**

भारत दूरसंचार निगमच्या अधिकाऱ्यांसमवेत बुधवारी अहिल्यानगर येथे पार पडलेल्या बैठकीत खासदार नीलेश लंके यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत विविध सुविधांमधील त्रृटींबाबत जाब विचारला. यावेळी बीएसएनएलच्या केंद्रीय समितीचे अध्यक्ष खासदार बजरंग सोनवणे हे उपस्थित होते. त्यांनीही अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली.

बैठकीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्याच्या दक्षिण लोकसभा मतदारसंघातील नगर, पारनेर, कर्जत, जामखेड, पाथर्डी, शेवगांव, श्रीगोंदे व राहुरी या तालुक्यांतील अनेक गावांमध्ये बीएसएनएल सिग्नल अत्यंत दुर्बल आहेत किंवा संपूर्णतः अनुपलब्ध आहे याकडे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यात




आले. संबंधित गावांमध्ये बीएसएनएलचे टॉवर तातडीने उभारण्याचे निर्देश देत ग्रामीण भागात बीएसएनएलची दुरसंचार सेवा पोहचविण्यासाठी ठोस योजना तयार करण्याची सुचना खासदार नीलेश लंके यांनी केली. ग्रामीण भागात डिजिटल भारत मिशन यशस्वी करण्यासाठी दर्जेदार सेवा पुरविणे आवष्यक असल्याचे यावेळी खा. लंके यांनी सांगितले. यावेळी खासदार बजरंग सोनवणे यांनी बीड लोकसभा मतदारसंघातील बीएसएनएल सेवांचा आढावा घेत ग्रामीण भागातील संपर्क व इंटरनेट सेवा बळकट करण्यावर भर दिला. बैठकीस बीएसएनएलचे महाप्रबंधक राजेंद्रसिंह चोंगड, डीजीएम प्लॅनिंग एस.के. पटेल, एमजीएम ओएमसी जी.एस. जोशी, राशिनकर, दीपक जोशी विजय पिंपरकर यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

### विविध मुद्यांचा आढावा

**या बैठकीमध्ये बीएसएनएलच्या एफटीटीएच फायबर कनेक्शन, मोबाईल टॉवर्सची स्थिती, कॉपर कनेक्शन व त्यावरील सेवा, नव्या मोबाईल टॉवरची आवष्यकता, प्रीपेड सेवा व कनेक्शनची उपलब्धता, दूरध्वनी केंद्र व त्यांची स्थिती, डिजिटल भारत निधीचा वापर आदी विविध मुद्यांवर चर्चा करण्यात येऊन सखोल आढावा घेण्यात आला.**

### दूरसंचार मंत्रालयाशी पत्रव्यवहार करणार

**आपण संसदेत जाऊन आठ महिने झाले तरी बीएसएनएल कार्यालयाकडून आतापर्यंत खासदार या नात्याने कोणतीही माहीती देण्यात आली नाही. अधिकारी भेटीसाठीही आले नाहीत. लोकप्रतिनिधींसंबंधातील शिष्टाचार न पाळणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याची टीपन्नी करत यासंदर्भात आपण केंद्रीय दूरसंचार मंत्रालयाशी पत्रव्यवहार करणार असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी यावेळी सांगितले.**

**Bhadrawati Shikshan Sanstha, Bhadrawati's**

**Kai. Nilkanthrao Shinde Prashaskiy Sewa Mahavidyalaya, warora**

**Affiliated**

**KaviKulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek**

**(Permanently non-granted)**

**संदर्भ: ककासंवि / महा.विभाग / BBC / २०२५ / १८२ दि. ११/०४/२०२५**

## Wanted

**Applications are invited for the following posts:**

| Sr. No | Subject | Total Number of Post | Mode of Appointment | Qualification | Category |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Principal | 1 | Full Time | As per the norms of UGC Regulation | Open |
| 2 | Librarian | 1 | Full Time | As per the norms of UGC Regulation | Open |
| 3 | Physical Teacher | 1 | Full Time | As per the norms of UGC Regulation | Open |

Duly qualified candidates shall apply on an application with attested copies of the certificate submit before 30/04/2025 on the email address knswarora@gmail.com

**Interview date: 16th May 2025**

**Address:**

**Old Municipal Corporation Building**

**Main Road Warora**
**Pin code 442907 ta. Warora Dist. Chandrapur**

Secretary

Dr. Kartik. N. Shinde

Bhadrawati Shikshan Sanstha Bhadrawati

# रोहा तालुका बुद्धिबळ संघटनेमार्फत बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात संपन्न

**रोहा । ज्ञानेश्वर वाणी**

रोहा तालुका बुद्धिबळ संघटनेच्या वतीने रोहा तालुक्यातील १५ वर्षांखालील व जिल्ह्यातील खुल्या गटातील खेळाडूंकरिता बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन रविवारी, १३ एप्रिल रोजी धाटाव येथील रोहा इंडस्ट्रियल असोसिएशनच्या सभागृहात करण्यात आले.स्पर्धेचे उद्घाटन सकाळी युवा नेते रुपेश बामुगडे, संतोष माने, दीपक जमदाडे, मयुरेश मोंडे, मंगेश देवकर, पोलीस अधिकारी पेडवी आणि रोहन चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.या स्पर्धेत एकूण ७६ स्पर्धकांनी सहभाग घेतला. सायंकाळी झालेल्या बक्षीस वितरण समारंभात रोहा प्रेस क्लब अध्यक्ष मा. सुहास खरीवले आणि उपसरपंच अशोक मोरे यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

ही स्पर्धा रोहा तालुका बुद्धिबळ संघटनेच्या स्थापनेनंतर प्रथमच आयोजित करण्यात आली होती. अध्यक्ष संकेत खोत, उपाध्यक्ष अमर सलागरे, सचिव विक्रांत जाना, खजिनदार महेश बामुगडे तसेच योगेश भगत, विवेक कांबळे, विवेक कानडे व हेमंत शेडगे यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.स्पर्धेचे नियोजन आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ नियमांनुसार करण्यात आले होते. याबद्दल पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी स्पर्धास्थळी भेट देऊन संघटनेच्या कामाची स्तुती केली. त्यांनी म्हटले की, मैदानी खेळांबरोबर बौद्धिक क्षमता वाढवणाऱ्या अशा स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आवश्यक आहेत.भविष्यात अशा जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात येणार असल्याचे संघटनेने जाहीर केले आहे.या उपक्रमात आर.आय.आर.सी. रोहा, रामशेठ नाकती, अमर सलागरे, मंगेश देवकर व योगेश भगत यांचे विशेष सहकार्य लाभले असून त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.




## बिटलेच्या यमाई देवी यात्रेचा सोमवारी मुख्य दिवस

# अखंड हरिनाम सप्ताह, देवीचा छबिना आणि जंगी कुस्त्यांचे मैदान आकर्षणाचा केंद्रबिंदू

**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यातील बिटले गावातील ग्रामदैवत श्री यमाई देवीच्या वार्षिक यात्रेच्या पार्श्वभूमीवर गावात धार्मिक व सांस्कृतिक उत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेचा मुख्य दिवस चैत्र शुद्ध कालाष्टमी, सोमवार दिनांक २१ एप्रिल रोजी असून, पहाटे मानाच्या पूजेनंतर श्री यमाई देवीस नैवेद्य व नारळ अर्पण करण्याचा विधी होईल. ग्रामस्थांच्या वतीने शनिवार, १२ एप्रिलपासून १८ एप्रिलपर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच 'बिटले प्रिमिअर लीग'च्या वतीने नाईट क्रिकेट स्पर्धा रंगतदार ठरली आहे. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी, मंगळवार २२ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता



देवीच्या नावाने 'जंगी कुस्त्यांचे मैदान' आयोजित करण्यात आले आहे.सोमवारी मुख्य दिवशी सायंकाळी श्री यमाई देवीचा छबिना लवाजम्यासह मुख्य मंदिरातून कल्लोळा पर्यंत नेण्यात येणार असून, संपूर्ण मार्गावर भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद अपेक्षित आहे. मंदिर परिसर विद्युत रोषणाईने सजवण्यात आला असून यात्रेच्या निमित्ताने गावात उत्सवाचे वातावरण आहे. लहान मुलांसाठी खेळणी, पाळणे, सौंदर्य प्रसाधने यांची दुकाने सजली असून मोठ्यांनाही या विविध आकर्षणांनी भुरळ घातली आहे.

# रोहा पाले खुर्द येथे भीम जयंती मोठ्या उत्साहात संपन्न

**रोहा । प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील पाले खुर्द येथे दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी संविधान निर्माते, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरी करण्यात आली.

या दिवशी सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सकाळी साडेदहा वाजता पाले खुर्द महिला मंडळाने गावातील ग्रुप ग्रामपंचायतीच्या सभागृहात जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून मानवंदना दिली.

दुपारी आणि संध्याकाळी स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले, ज्याचा लाभ गावकऱ्यांनी व पाहुण्यांनी घेतला. यानंतर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात संगीत खुर्ची, लहान मुलांसाठी



चित्रकला स्पर्धा आणि भाषण स्पर्धा यासारखे मनोरंजनात्मक कार्यक्रम होते.

हा कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी हितसंवर्धक मंडळ व महिला मंडळ पाले खुर्दच्या कार्यकर्त्यांनी अपार मेहनत घेतली. विशेषतः मंडळाचे अध्यक्ष सखाराम मोरे, उपाध्यक्ष राकेश शिंदे, अभिजीत शिंदे, मिलिंद शिंदे, काशिनाथ शिंदे, सचिन शिंदे, अर्जुन शिंदे यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मरणार्थ उत्साहात पार पडलेला हा कार्यक्रम गावातील वातावरण मनमोहक बनवणारा होता.

# बळ्हेगाव येथे गाळ मुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेचा शुभारंभ



**वैजापूर । अर्जुन शिंदे**

महाराष्ट्र शासनाच्या गाळ मुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेचा शुभारंभ आज वैजापूर तालुक्यातील बळ्हेगाव येथील पाझर तलावात करण्यात आला. यावेळी जलसंधारण अधिकारी तुषार गवळी, सतीश नादरकर, कैलास पाटील बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष अर्जुन जाधव, सचिव अरुण सोनवणे, सीआरपी बाळू बालेदार, तसेच शेतकरी ज्ञानेश्वर सूर्यवंशी, गणेश सूर्यवंशी, योगेश सूर्यवंशी, गोकुळ सूर्यवंशी, भानुदास काकडे आणि बाळू सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

गाळ मुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेतून गाळ उपसा करून शेतात टाकण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. या उपसापासून जमिनीची सुपीकता वाढवण्यास मदत होईल. याशिवाय, धरणाची पाणी साठवण क्षमता वाढल्यामुळे, जवळच्या विहिरींमध्ये आणि बोरवेल्समध्ये पाणी पातळी वाढेल. यामुळे शेतकऱ्यांना पाण्याच्या उपलब्धतेत सुधारणे होईल, अशी आशा व्यक्त करण्यात आली आहे.

# महात्मा फुले चिरकाल टिकणारा स्वातंत्र्यासाठी आवश्यक असलेल्या भूमीच्या मशागत करणारे खरे देशभक्त–प्रा.लोनबले

**मुल । प्रतिनिधी**

क्रांतीज्योती महिला माळी समाज कवडपेठच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती स्मारकाचा अनावरण सोहळा व महात्मा फुले यांची १९८ वी जयंती निमित्त प्रबोधनाचा कार्यक्रम दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मुख्य चौकाच्या प्रांगणात संपन्न झाला.

या अनावरण सोहळा व प्रबोधन कार्यक्रमाचे उद्घाटिका म्हणून डॉ. अभिलाषा गावतुरे, सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ आणि फुले शाहू आंबेडकरी विचारवंत, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. विजय लोनबले, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राकेश गावतुरे, सुप्रसिद्ध पॅथॉलॉजिस्ट, डॉ. पद्माकर लेनगुरे, माजी पंचायत समिती सदस्य, हसन वाढई, संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती मुल, बंडू गुरनुले, माजी प्राचार्य बेंबाळ, ज्ञानज्योती फाउंडेशन सावली चे अध्यक्ष दिनकर मोहुलें ,जस्मिता लेनगुरे, सरपंच ग्रामपंचायत चिचाळा, अनिल शेंडे, माजी सरपंच ग्रामपंचायत चिरोली, दशरथजी मांदाळे, चिचाळा हेटी, प्रकाश पा. लेनगुरे, अध्यक्ष गाव माळी समाज, अतुल निकोडे, सदस्य ग्राम पंचायत चिचाळा, उमेश नागोसे, अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, अविनाश भेंडारे, अध्यक्ष संयुक्त वनव्यवस्थापन समिती इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते.फुले दांपत्यांचे विचार आत्मसात करून कृती केल्यास समाजाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही, असे मत डॉ. अभिलाषा गावतुरे यांनी व्यक्त केले. त्यांनी युवकांना विविध क्षेत्रात आपला ठसा उमठविण्याचा, शेती, आरोग्य व शिक्षण या मूलभूत गरजांकडे सरकारने लक्ष देण्याचा आणि युवकांनी सजग राहण्याचा आवाहन केला.अध्यक्षीय भाषणात प्रा. विजय लोनबले यांनी महात्मा



फुले यांचे योगदान आणि त्यांचे उद्योजकीय कार्य यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, महात्मा फुले हे केवळ थोर समाज सुधारक नव्हे, तर एक यशस्वी उद्योजक देखील होते. त्यांचा उद्योगातून मिळालेला नफा समाज सुधारण्यासाठी वापरला जात होता. त्यांनी पुढे सांगितले की, महापुरुषांचे विचार जिवंत ठेवण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवश्यकता आहे.डॉ. पद्माकर लेनगुरे आणि बंडू गुरुनुले यांनी फुलांच्या जीवनकार्यावर आणि त्यांच्या विचारांचा पालन करण्याचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष बंडू वाढई यांनी केले. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी लेझीम पथकाने कला कौशल्य दाखवत मान्यवरांना सभास्थळी आणले आणि त्यांना महापुरुषाचे पुस्तक भेट दिले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रांतीज्योती महिला माळी समाज कवडपेठचे अध्यक्ष बंडू पाटील वाढई, उपाध्यक्ष सुरेश मोहुलें, सचिव वर्षा वाढई, कोषाध्यक्ष छायाताई शेंडे, सहसचिव संध्या गुरनुले, विलास वाढई व इतर सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला तालुक्यातील समाज बांधव, भगिनी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.विखे पाटील आय.टी.आय.मध्ये इंन्फोसिस स्प्रिंगबोर्ड 'स्किल ऑन व्हिल्स' उपक्रम संपन्न


**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर येथील डॉ. विखे पाटील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड या कंपनीमार्फत राबविण्यात आलेल्या 'स्किल ऑन व्हिल्स' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. एलईडी स्क्रीन व लॅपटॉपच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्रभावी प्रशिक्षण देण्यात आले.या उपक्रमाचे उद्घाटन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे टेक्निकल डायरेक्टर श्री. सुनील कल्हापुरे यांच्या हस्ते करण्यात आले.ङ्म्या प्रशिक्षणात इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, इलेक्ट्रीशियन, वायरमन तसेच कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रॅमिंग असिस्टंट या ट्रेडमधील प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड द्वारे राबविण्यात येणारा 'मेकर लॅब' हा उपक्रम २१व्या शतकातील जीवनकौशल्ये, नवकल्पनांची ओळख, व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने राबवला जात आहे. व्हिडिओ बेस्ड लर्निंग, असाइनमेंट लर्निंग यासोबतच ट्रॅफिक कंट्रोल सिस्टम, ऑटोमॅटिक स्ट्रीट लाइट कंट्रोल सिस्टीम यांची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली.उद्घाटन प्रसंगी श्री. सुनील कल्हापुरे यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करत विद्यार्थ्यांसाठी हे प्रशिक्षण भविष्यासाठी उपयोगी ठरणारे असल्याचे सांगितले.ङ्म्या वेळी संस्थेचे प्राचार्य श्री. अनिल सुर्यवंशी, उपप्राचार्य श्री. काकडे, श्री. तुतारे, श्री. बडे, श्री. साठे, श्रीमती नलगे आणि आयटीआयतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जलसंपदा मंत्री आणि संस्थेचे चेअरमन राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, डायरेक्टर जनरल (प्रशासन) डॉ. पी. एम. गायकवाड आणि डायरेक्टर (मेडिकल) डॉ. अभिजीत दिवटे यांनी संस्थेचे अभिनंदन केले आहे.

# कोल्हार येथे श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सप्ताह

**कोल्हार । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा व बाल संस्कार केंद्र, राजुरी रोड कोल्हार येथे २० एप्रिल ते २६ एप्रिल दरम्यान श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त एक विशेष सप्ताह आयोजित करण्यात आले आहे.या सप्ताहात, परमपूज्य श्री गुरु माऊलींच्या कृपा आशीर्वादाने व मार्गदर्शनाने सामुदायिक श्री गुरुचरित्र वाचन, अखंड नाम जप यज्ञ आणि प्रहर सप्ताह सुरु होईल. सप्त्याह च्या दरम्यान रोज भूपाळी आरती, नित्यस्वाहाकार सामुदायिक गुरुचरित्र वाचन, नैवेद्य आरती आणि विशेष यागाचे आयोजन होईल.




यामध्ये दुर्गा सप्तशती व स्वामी चरित्रसारामृत पाठ देखील केला जाईल.

रोज सकाळी ८ ते संध्याकाळी ८ महिलांचे प्रहर आणि संध्याकाळी ८ ते सकाळी ८ पुरुषांचे प्रहर सेवा होणार आहेत. शनिवार, १९ एप्रिल रोजी ग्रामदेवता पूजन व मंडल मांडणी होणार असून, २० एप्रिल रोजी मंडळ स्थापना, अग्नि स्थापना, देवता हवन व नित्यस्वाकार होईल.गणेश याग, चंडी याग, गीता याग आणि रुद्र याग यांसारख्या उच्च कोटीच्या सेवांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व भाविक भक्तांनी या सर्व सेवांमध्ये भाग घेऊन परब्रम्ह श्री स्वामी समर्थ महाराजांच्या चरणी आपली सेवा अर्पित करण्याचा लाभ घ्यावा, असे श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, राजुरी रोड कोल्हार यांच्याकडून आवाहन करण्यात आले आहे.

## भेजगाव येथे रक्तदान शिबिरातून महापुरुषांना अभिवादन

# महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**मूल । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त सक्षम बहुउद्देशीय ग्रामविकास संस्था, भेजगाव यांच्या विद्यमाने रविवार, दि. १३ रोजी जिल्हा परिषद शाळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात २१ युवकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करीत महापुरुषांना अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षतेसाठी समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रा. विजय लोनबले हे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून विलास मोहुर्ले, प्रदीप वाढई, सक्षम संस्थेचे अध्यक्ष शशिकांत गणवीर, विजय गुरुनुले, येसगाव पोलिस पाटील राजू कोसरे, चिरोली येथील पोलिस पाटील गोकुळ मोहुर्ले, मरेगाव येथील ग्रामपंचायत सदस्य आकाश वाकुडकर, उमेदचे प्रभाग समन्वयक मनीष मोहुर्ले, गडिसुर्ला ग्रामपंचायत सदस्य प्रीतम आकुलवार, मुन्ना गेडाम, सोनी मोहुर्ले, सारिका बावणे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

रक्तदान शिबिरासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर येथील रक्तपेढीतील आरोग्य अधिकारी डॉ. दिशा मेश्राम, समाजसेवक राकेश शेंडे आणि त्यांच्या टीमने रक्त संकलन केले. कार्यक्रमात महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. या शिबिरात २१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.संस्थेचे अध्यक्ष शशिकांत गणवीर, आकाश वाकुडकर, मनीष मोहुर्ले, पद्माकर वाढई, विपुल वाढई, रिलेश लेनगुरे, संदीप नैताम, चंद्रशेखर मोहुर्ले, मंगेश लेनगुरे, विजय गुरनुले, गितेश शेंडे, राजू कोसरे, मनोज गणवीर, शुभम गुरनुले, गोकुळ मोहुर्ले, शुभम गेडाम, प्रीतम आकुलवार, प्रशांत डोरलीकर, रितिक रापेलीवार, अमर गुरनुले, परिष गांगरेड्डीवार यांनी रक्तदान केले.कार्यक्रमाचे यशस्वी संचालन विशाखा गणवीर यांनी केले, तर आभार मनेण्याचे कार्य मनोज गणवीर यांनी पार पडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नम्रता लाकडे, शालुताई गणवीर, गुलशन लाकडे, अभिषेक गणवीर आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.




### संदीप नैताम यांनी केले ७४ व्या रक्तदानाचे योगदान

**बेंबाळ येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते संदीप नैताम यांनी यापूर्वी ७३ वेळा रक्तदान केले असून, यावेळी भेजगाव येथील शिबिरात सहभागी होऊन ७४ व्या रक्तदानाचे महत्त्वपूर्ण योगदान दिले.**

# पवनूरच्या गळाची रथयात्रा-३०६ वर्षांची परंपरा; धार्मिक उत्साहात साजरी होणार

## विदर्भातील एकमेव गळाची रथयात्रा प्रसिद्ध



**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा तालुक्यातील धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या पवनूर गावात यंदाही ३०६ वर्षांची परंपरा लाभलेल्या गळाच्या रथयात्रेचे आयोजन चैत्र कृष्ण पक्ष पंचमी, १७ एप्रिल रोजी करण्यात आले आहे. ही विदर्भातील एकमेव गळाची रथयात्रा असून दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी होणार आहे.पवनूर गावाच्या टोकावर वसलेल्या पाताळमाता मंदिरात चैत्र आणि अश्विन नवरात्र मोठ्या श्रद्धेने साजरे केले जातात. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून सुरू झालेल्या यात्रोत्सवाचा समारोप १७ एप्रिल रोजी गळाच्या रथयात्रेने होणार आहे. या रथयात्रेचा उद्देश गावातील आरिष्ट दूर करणे व सामाजिक सलोखा टिकवणे हाच असून गावकऱ्यांच्या सहकार्याने याचे आयोजन केले जाते.

रथयात्रेदरम्यान एक लाकडी झुला सजवून देवीभक्त अरुण लांडे आणि त्यांचे सहकारी संपूर्ण गावाची परिक्रमा करतात. झुला लाकडी बैलबंडीपासून सुमारे ५० फूट अंतरावर लटकवलेला असतो आणि तो खांद्यावर घेत संपूर्ण गावात प्रदक्षिणा केली जाते. या चित्तथरारक दृश्यासाठी पंचक्रोशीतून मोठ्या संख्येने भाविक पवनूरमध्ये येतात.

गावातील गळ समिती रथ सजावटीसाठी गेल्या महिनाभरापासून तयारी करत असून, दोर, लाकडी जु, इतर साहित्य वापरून मजबूत रथ तयार करण्यात आला आहे. मारोती दाभेकर, सतिश दाभेकर, धनराज कोंडलकर, अर्जुन भोयर, दिनेश कोंडलकर, रमेश कडू, आशीष दाभेकर, विक्रम कडू, अनुप चौधरी, अरुण हजारे, खुशाल राऊत, मधुकर महात्मे, प्रणय कोंडलकर आदी कार्यकर्ते यासाठी मेहनत घेत आहेत.

यात्रेच्या दिवशी माहेरवाशिण मुली विशेषतः आपल्या माहेरी येतात. घरोघरी पाणग्यांचा नैवेद्य दाखवला जातो. या महोत्सवामुळे संपूर्ण गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. यात्रेला अधिक भव्य रूप देण्यासाठी अरुण लांडे, सुरेंद्र कारणकर, सागर कोंडलकर, प्रवीण चौधरी, रोशन पांडे, प्रमोद राऊत, मारोती तिवसकर, उत्तम डांगे, संकेत ढाकुलकर, रवींद्र कारणकर, सुरज कडू आदी कार्यकर्ते अथक परिश्रम घेत आहेत.सायंकाळी ४ वाजता गळाच्या रथयात्रेला सुरुवात होणार असून, पंचक्रोशीतील भाविकांनी या अनोख्या परंपरेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पवनूर ग्रामस्थांनी केले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विवेक विचार मंच व विद्यार्थी परिषद आयोजित रक्तदान शिबिर यशस्वी




**वर्धा । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विवेक विचार मंच आणि विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात जिल्हा संयोजक राहुल मुन यांनी सपत्नीक रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण निर्माण केले. त्यांच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात कौतुक केले. या प्रसंगी मंचाचे अमित भित्रे, वैभव वागदे, शुभम कांबळे, वामन वागदे, प्रशांत अवचट,यश दोड, दुर्गेश साठोणे आदी पदाधिकारी आणि सदस्यांनी देखील रक्तदान करून शिबिराच्या यशात मोलाचा वाटा उचलला. रक्तदान शिबिराच्या आयोजनामागील उद्देश म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य आणि विचार कृतीतून पुढे नेणे हा असल्याचे आयोजकांनी सांगितले. या उपक्रमामुळे समाजात रक्तदानाविषयी जनजागृती होऊन तरुण पिढीला प्रेरणा मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## कवठा रोडवरील चहा कँटीनजवळ दोन युवकांवर प्राणघातक हल्ला-एक गंभीर जखमी

**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव-वर्धा रोडवरील रिलायन्स पेट्रोल पंपासमोर असलेल्या एका चहा कँटीनजवळ आज दुपारी सुमारे १.३० वाजता दोन युवकांवर दहा ते बारा युवकांच्या टोळीने प्राणघातक हल्ला केला. दगड आणि तलवारींच्या मदतीने करण्यात आलेल्या या अचानक हल्ल्यात एक युवक गंभीर जखमी झाला असून, दुसरा युवक घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाला.



गंभीर जखमी झालेल्या युवकाची ओळख ओम राजेंद्र माडवगडे (वय २३, रा. पुलगाव) अशी असून, त्याला तात्काळ पुलगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्यामुळे त्याला पुढील उपचारासाठी वर्धा येथे रेफर करण्यात आले आहे.प्राथमिक माहितीनुसार, रामनवमीच्या जुलूसदरम्यान पुलगाव पोलिस स्टेशनसमोर जखमी युवक व आरोपींमध्ये वाद झाला होता. नंतर दोघांनी माफी मागून प्रकरण मिटवले होते, असे सांगितले जात आहे. तरीही आज त्यांच्यावर अचानक हल्ला करण्यात आल्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.हल्ल्यावेळी कँटीनमध्ये तोडफोड झाली असून दरवाजाचे नुकसान झाले आहे. घटनास्थळी वर्धा फॉरेन्सिक टीम दाखल होऊन तलवार व रक्ताचे नमुने गोळा केले आहेत. पुलगाव पोलिस अधिक तपास करत असून आरोपींचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे पुलगाव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## झोपडीतही जन्मतात कलाकार-पुलगावच्या हरप्रीतकौरची आंतरराष्ट्रीय स्पर्धेत चमकदार कामगिरी

**पुलगाव । प्रतिनिधी**

झोपडीतही कलाकार जन्म घेतात हे विधान खरे ठरवत पुलगाव येथील पाच वर्षीय हरप्रीतकौर हिने आंतरराष्ट्रीय रंगोत्सव चित्रकला स्पर्धेत आपले कौशल्य सिद्ध करत अ श्रेणीतील पुरस्कार पटकावला आहे. तिच्या या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.




हरप्रीतकौर ही आर.के. ज्ञानमंदिरातील लोटस ग्रुपमध्ये शिक्षण घेत असून, सध्या के.जी. प्रथम वर्गात शिक्षण घेत आहे. तिचे वडील चंदनसिंग, आई आशाकौर, आजोबा इमरतसिंग व आजी दूधकौर हे बावरी समाजातील अत्यंत गरीब कुटुंबातून असून, सध्या पुलगाव नगरपरिषदेकडील मुस्लिम कब्रस्तान मार्गावरील अर्धवट बांधकाम असलेल्या व अस्वच्छतेच्या वातावरणातील वस्तीत वास्तव्यास आहेत.अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या हरप्रीतकौरने तिच्या वर्गशिक्षिका सुश्री मोनाली राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला आणि तिच्या नैसर्गिक कलेच्या बळावर तीन प्रमाणपत्रे, एक पदक आणि एक स्मृतिचिन्ह मिळवले.तिच्या या यशामुळे हे स्पष्ट झाले आहे की, कला, कौशल्य आणि यशासाठी वय, जात, धर्म, संपत्ती अथवा अनुभव गरजेचा नसतो, तर ती ईश्वरदत्त देणगी असते. हरप्रीतचे कुटुंब अत्यंत कठीण परिस्थितीतही तिच्या शिक्षणासाठी झटत आहे.या होतकरू विद्यार्थिनीसाठी शासन व जनप्रतिनिधींनी पुढे येऊन तिच्या शिक्षणासाठी आणि राहणीमानासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.हरप्रीतकौरचे हे यश इतर गरीब, उपेक्षित भागांतील विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

## इंटरव्हील क्लब हिंगणघाट यांच्या वतीने शीतल जलसेवा उपक्रमाचे उद्घाटन



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

इंटरव्हील क्लब, हिंगणघाटच्या वतीने उन्हाळ्याच्या तीव्रतेतून जनतेला दिलासा देण्यासाठी शीतल जलसेवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन डॉ. अशोक मुखी व डॉ. प्रशांत कोठारी यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी क्लबच्या अध्यक्षा डॉ. रूपल कोठारी यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी क्लबच्या प्रमुख सदस्यांमध्ये सारिका डोंगरे, कुमुद व्यास, वर्षा बोंगिरवार, शोभा बोठरा, छाया लाहोटी, संतोष डालिया, सुचिता मुंद्रा, संगीता मेंडे, सारिका भिडकर, मेघा नाहर, माधुरी शिवणकर यांचा समावेश होता. सर्व सदस्यांनी समाजसेवेसाठी घेतलेला पुढाकार निश्चितच प्रेरणादायी आहे.ही जलसेवा शहरातील प्रमुख ठिकाणी राबविण्यात येत असून, गरजूंना थंड पाण्याची सुविधा दिली जात आहे. या उपक्रमामुळे उन्हाळ्यात नागरिकांना दिलासा मिळणार असून, क्लबच्या सामाजिक भानाची प्रचिती यामुळे येते.या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## ठाणे जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी रयत शेतकरी संघटना सज्ज

### प्रश्नांची सोडवणूक न झाल्यास आंदोलनाचा इशारा-ॲड.रविप्रकाश ऊर्फ बापूसाहेब देशमुख

**ठाणे । रविंद्र धारवणे**

शेती हा देशाचा कणा मानला जातो, परंतु आज या कण्यालाच पाठीचा कणा देणारी व्यवस्था अपयशी ठरत असल्याचे चित्र ठाणे जिल्ह्यात दिसून येते. कधी निसर्गाचा लहरीपणा, कधी प्रशासनाचा उदासीनपणा आणि कधी विमा-कर्जमाफीच्या घोषणांमधील फसवणूक अशा विविध समस्यांनी शेतकरी हतबल झालेला आहे. या पार्श्वभूमीवर रयत शेतकरी संघटनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष रवींद्र धारवणे, रामचंद्र घोडविंदे, अनिता दिनकर आणि कांचन कापडी यांनी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ड. रविप्रकाश ऊर्फ बापूसाहेब देशमुख यांची देवगड, संभाजीनगर येथे भेट घेऊन ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या.तहसील कार्यालयात फेरफारासाठी शेतकऱ्यांना लागणाऱ्या वारंवार फेऱ्या, महामंडळांमधील भ्रष्टाचारामुळे होणारी फसवणूक, कर्जमाफीच्या अमलबजावणीत होणारी दिरंगाई अशा विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



या भेटीत देशमुख यांनी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक झालीच पाहिजे, अन्यथा वेळ आली तर रस्त्यावर उतरून आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा दिला. त्यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचेही स्पष्ट केले.रयत शेतकरी संघटना ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणार असून, भविष्यात शेतकऱ्यांचे प्रश्न न मिटल्यास निर्णायक आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही या बैठकीत देण्यात आला.

## प्रशासन व जनतेतील समन्वयासाठीच जनता दरबार-आमदार काशिनाथ दाते

### पारनेरमध्ये शेकडो नागरिकांनी मांडल्या आपापल्या समस्या; अनेक तक्रारींचे तातडीने निराकरण

> नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे प्रशासनाच्या माध्यमातून तातडीने निराकरण करणे हा जनता दरबाराचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक महिन्याला असा दरबार आयोजित करून आम्ही जनतेच्या जवळ राहू आणि त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करू.
> – काशिनाथ दाते, आमदार




**पारनेर । गणेश वाघ**

पारनेर शहरातील इंदिरा भवन येथे आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वात आयोजित जनता दरबारात शेकडो नागरिकांनी सहभाग घेत आपल्या विविध तक्रारी, अडचणी मांडल्या. महसूल, पुरवठा, भूजमापन, पंचायत समिती आदी विभागांशी संबंधित समस्या ऐकून घेत त्यापैकी अनेकांचा तत्काळ निपटारा करण्यात आला.

या दरम्यान आमदार दाते यांनी दर महिन्याला जनता दरबार घेऊन प्रशासनाच्या माध्यमातून नागरिकांच्या अडचणी सोडवण्याचा आमचा निर्धार आहे असे सांगत प्रशासन व जनतेतील समन्वय अधिक बळकट करण्याची ग्वाही दिली.

जनता दरबारात तहसीलदार गायत्री सौंदाणे, गटविकास अधिकारी दयानंद पवार, पारनेर पोलीस निरीक्षक समीर बावरकर, सुपा पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे आदी प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी अनेक तक्रारींचे नोंदवहीत तातडीने निवारण करण्यात आले. दरबारात भाजप तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, ज्येष्ठ नेते वसंत चेडे, जिल्हा बँक संचालक प्रशांत गायकवाड, महिला अध्यक्षा सुषमाताई रावडे, युवक अध्यक्षा अपर्णा खामकर, संदीप कपाळे आदी पदाधिकाऱ्यांनी नागरिकांशी संवाद साधत प्रशासनाशी समन्वय साधण्याचे काम केले.या उपक्रमामुळे प्रशासनाविषयी जनतेचा विश्वास वाढला असून, आमदार दाते यांच्या कार्यशैलीचे नागरिकांनी खुलेपणाने कौतुक केले. आगामी काळातही अशाच स्वरूपाचे दरबार घेऊन नागरिकांच्या समस्या सोडवण्याचा निर्धार महायुतीच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# भंडाऱ्यात अभिवादन चौकात बाबासाहेबांची जयंती उत्साहात;भोजनदान व बाईक रॅली ठरल्या विशेष आकर्षण



**भंडारा । प्रतिनिधी**

समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे प्रतीक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती भंडारा शहरात अभिवादन चौक येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनसेवेच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार परिनय दादा फुके, कवी व लेखक मार्कंड नंदेश्वर, सामाजिक कार्यकर्ते अमर खंडाळे, भाजप अनुसूचित जाती मोर्चा शहराध्यक्ष मयूर मार्कंड नंदेश्वर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आमदार परिनय फुके यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या काळात बाबासाहेबांच्या विचारांची समाजाला अधिक गरज आहे. त्यांनी दिलेले संविधान व सामाजिक समतेचे तत्त्वज्ञानच देशाच्या प्रगतीचा मार्ग आहे. त्यांनी कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाचे कौतुक करत आयोजकांचे विशेष अभिनंदन केले.

सकाळच्या सत्रात समाजबांधवांकडून भव्य बाईक रॅली काढण्यात आली. रॅलीत सहभागी झालेल्या नागरिकांना आणि उपस्थितांसाठी मसाला ताकाचे वाटप करण्यात आले.

सायंकाळी जनतेसाठी भव्य भोजनदानाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये हजारो नागरिकांनी आलूभात आणि सुजाता खिरीचा मनमुराद आस्वाद घेतला. कार्यक्रमादरम्यान भीम गीते आणि नृत्य सादर करून वातावरण उत्साही करण्यात आले.या यशस्वी कार्यक्रमासाठी मयूर नंदेश्वर, मार्कंड नंदेश्वर, करुणा नंदेश्वर, सचिन नंदेश्वर, माधुरी सहारे, अमर खंडाळे, नताशा खंडाळे, चेतना खंडाळे, अमेंदीता खंडाळे, अनुक्रिता खंडाळे, स्वप्निल नगरारे, आम्रपाली नगरारे, भावेश पशिने, विशाखा पशिने, शरन ढोके, नंदु राजपुरोहित, आशु गोंडाने, रुबी चड्डा, सचिन कुंभलकर, निलीमा रामटेके, विनय बन्सोळ, संजय मेश्राम, देवानंद सुखदेवे, भामरसिंग ऐयरवार आदींनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाच्या समाप्तीला सर्व उपस्थितांनी बाबासाहेबांचे विचार समाजात रुजवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# देवाडा येथे रोशनपाल महाराज यांच्या कीर्तनाने भीमजयंती उत्सवाला खास रंग

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सप्तखंजेरी वादक रोशनपाल महाराज यांच्या कीर्तनाने १४ एप्रिल रोज सोमवारला देवाडा येथील १३४ व्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाला एक वेगळाच रंग दिला. बाबासाहेबांच्या विचारधारेवर आधारित या उत्सवात रोशनपाल महाराज यांच्या कीर्तनाने सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं. त्यांच्या गजरात कोटी कुळे भिमा तुझ्या जन्मामुळे अशा गजराने हजेरी लावली, ज्यामुळे उपस्थित प्रत्येक व्यक्ती बाबासाहेबांच्या संघर्ष आणि त्यांच्या विचारांच्या प्रेरणेने भारावली.

रोशनपाल महाराज हे सत्यपाल महाराज यांचे शिष्य असून, त्यांचं कीर्तन केवळ धार्मिक नसून सामाजिक जागृतीचे एक प्रभावी माध्यम ठरलं आहे. त्यांनी आपल्या गजरात बाबासाहेबांच्या संघर्षाची गोडी, त्यांच्या शिक्षणावर दिलेलं बल आणि समाजातील प्रत्येक घटकाला समानतेचा हक्क असावा याचा ठळक संदेश दिला.



सामाजिक समतेचा गजर करणारे हे कीर्तन बाबासाहेबांच्या विचारांना एका नव्या उंचीवर नेऊन ठेवलं. रोशनपाल महाराज यांच्या शब्दांमध्ये जात-पात, विषमता आणि अन्यायाविरुद्ध एक गजर होता. त्यांनी या कीर्तनातून उपस्थितांना जागरूक करत बाबासाहेबांच्या संघर्षाची गाथा मांडली.

कार्यक्रमाच्या समाप्तीला सर्व उपस्थितांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत, जय भीम च्या गजरात कार्यक्रमाचा समारोप केला. यावेळी आयोजकांनी गावातील सर्व स्तरातील लोकांना एकत्र आणत, बाबासाहेबांच्या विचारांच्या प्रचार-प्रसाराचा महत्त्व पटवला.भीमजयंती उत्सव समिती आणि विदर्भ इस्टेट ५ चे सर्व रहिवासी, देवाडा यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी अनेक समाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित व्यक्ती आणि गावकऱ्यांची उपस्थिती होती.रोशनपाल महाराज यांच्या कीर्तनाने देवाडा परिसरात एक नविन सामाजिक चेतना निर्माण केली, आणि बाबासाहेबांच्या विचारांचा ठळक संदेश दिला.

# लोकशिक्षण संस्थेच्या परिसरात क्रिकेट सामन्यांचे आयोजन; लोकमान्य रॉयल्स विजयी

**वरोरा । प्रतिनिधी**

लोकशिक्षण संस्थेद्वारा संचालित विविध शाळा महाविद्यालयांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी करिता आयोजित लोकमान्य प्रीमियर लीग क्रिकेट सामन्यांमध्ये लोकमान्य रॉयल्सने अव्वल स्थान पटकविले.



याप्रसंगी आयोजित समारोपीय समारंभात लोकशिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा श्रीकांत पाटील, उपाध्यक्ष विकास घुडे, कार्यवाह प्रा विश्वनाथ जोशी, एडवोकेट दुष्यंत देशपांडे, संचालक डॉ ब्रह्मदत्त पांडे, अनिल डोंगरे मंगेश मल्हार, प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री, राहुल राखे, संजय आंबुलकर आदींची उपस्थिती होती. या प्रसंगी बोलताना प्रा. पाटील यांनी क्रिकेट खेळाच्या आयोजनाबद्दल कर्मचाऱ्यांचे यांचे कौतुक केले, तसेच आगामी काळात यामध्ये इतर खेळांचा समावेश करावा असेही ते म्हणाले. प्रा जोशी, एडवोकेट देशपांडे, प्राचार्य डोंगरे, डॉ. पांडे आदींनी आपले मनोगत याप्रसंगी व्यक्त केले.या प्रीमियर लीग मध्ये लोकमान्य वॉरियर्स यांनी द्वितीय स्थान तर लोकमान्य किंग लॉयन्स यांनी तृतीय स्थान पटकाविले. सामनावीर पुरस्कार निलेश मजगवळी, उत्कृष्ट फलंदाज सुरेंद्र उरकांदे, उत्कृष्ट गोलंदाज अमोल सालवटकर, मालिकावीर आकाश धगवे आणि उत्तम झेलपटू म्हणून प्रयाग ठाकरे यांनी पुरस्कार पटकविले.एकूण २५ दिवस चाललेल्या या सामन्या चे संयोजन पंकज गहूकर, दशरथ चिकटे आणि लोकमान्य प्रीमियर लीगच्या सदस्यांनी केले.

# बाभुळसर बुद्रुक येथे बाळासाहेब नागवडे यांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न

## शिरूर तालुका खरेदी विक्री संघाचे नवनिर्वाचित व्हा.चेअरमन म्हणून झालेल्या निवडीचे ग्रामस्थांतून जल्लोषात स्वागत



**शिरूर । रमेश बनसोडे**

शिरूर तालुका खरेदी विक्री संघाचे नवनिर्वाचित व्हा. चेअरमन बाळासाहेब नागवडे यांचा गौरव समारंभ बाभुळसर बुद्रुक येथे संत तुकाराम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था यांच्या वतीने मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग आणि मान्यवरांची उपस्थिती यामुळे कार्यक्रम अधिकच विशेष ठरला.

कार्यक्रमात संस्थेचे चेअरमन मनोहर मचाले व उपाध्यक्ष हनुमंत भाऊ पाटोळे यांच्या हस्ते बाळासाहेब नागवडे यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना बाळासाहेब नागवडे यांनी संस्थेच्या जडणघडणीत स्व. तुकाराम बाबा नागवडे यांचे योगदान विशेषपणे नमूद करत, विविध माजी संचालक व ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला.ते म्हणाले, संस्थेची आर्थिक उलाढाल आज तीन ते साडेतीन कोटी रुपयांच्या घरात आहे, हे केवळ सभासदांच्या प्रामाणिक सहकार्यामुळे शक्य झाले आहे. यंदाच्या निवडणुकीत हनुमंत पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली आपण विजयी झालो असल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले.या सोहळ्यास दिलीप नागवडे (अध्यक्ष, वारकरी सेवा संघ), संतोष नागवडे (भीमा-घोड ऍग्रो कंपनी), राजेंद्र पाडळे पाटील (उपाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी), अल्लाउद्दीन अलवी (मा. व्हा. चेअरमन), शिवाजी नागवडे, जालिंदर नागवडे, शरद नागवडे, दत्तात्रय नागवडे मुंबईकर, भाऊसाहेब माने, पत्रकार गवळी व कुसेकर, सौरभ नागवडे, जाकीर सय्यद व अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक दिलीप बापू नागवडे यांनी केले, सूत्रसंचालन अल्लाउद्दीन अलवी यांनी तर आभार प्रदर्शन सौरभ नागवडे यांनी केले. एकात्मतेने आणि प्रेरणादायी वातावरणात झालेला हा सत्कार सोहळा गावकरी व सभासदांच्या मनात नवचैतन्य निर्माण करणारा ठरला.

# जि.प.उच्च प्राथमिक शाळा येनोली माल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील येनोली माल येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण, मेणबत्ती व अगरबत्ती प्रज्वलित करून करण्यात आली.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर केली. कार्यक्रमादरम्यान शाळेतील सहशिक्षिका करुणा सोनटक्के यांनी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व माजी उपाध्यक्ष योगेश्वर पितांबर शेंडे यांना भारतीय संविधान हे पुस्तक भेट दिले. हे पुस्तक शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश कोयताडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वर शेंडे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुख्याध्यापक प्रकाश कोयताडे उपस्थित होते. यावेळी सहशिक्षिका करुणा सोनटक्के, आंबडारे काकू आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावना विषय शिक्षक सुशांत कंदिकुरवार यांनी केली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या दृष्टिकोनातून घेतलेला हा उपक्रम शाळेच्या सामाजिक जाणीवेचे प्रतीक ठरला.




# नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेस उत्साहात प्रारंभ

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा २) अंतर्गत वैजापूर तालुक्यातील लोणी बुद्रुक येथे प्रकल्पाचा प्रारंभ आज विविध उपक्रमांनी करण्यात आला. जि. प. प्रा. शाळा लोणी बु. येथील विद्यार्थ्यांच्या सहभागातून प्रभात फेरी काढण्यात आली आणि जनजागृती करण्यात आली.यानंतर गावाचा नकाशा तयार करण्यात आला व स्थानिक विहिरीची पाणी पातळी मोजण्यात आली. या उपक्रमात मंडळ कृषी अधिकारी साळवे, कृषी पर्यवेक्षक खेमनर, कृषी सहाय्यक जेजुरकर , कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश इंगळे, शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद, डिजिटल मीडिया पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष भारत सोनवणे, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या योजनेचा उद्देश पाण्याचा ताळेबंद तयार करून शेतीमध्ये यांत्रिकीकरण, आधुनिक जलसंधारण उपाय, कमी पाण्यात येणारी पिके, पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत झिरपवणे, व उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करणे असा आहे.या योजनेंतर्गत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांमुळे गावाचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.








# अष्टविनायक महामार्गावर दिशादर्शक फलकांचे अनावरण पाटस ग्रामविकास फाउंडेशनचा उपक्रम कौतुकास्पद

**दौंड । योगेश राऊत**

पाटस ग्रामविकास फाउंडेशनच्या वतीने संस्थेचे मार्गदर्शक जुनेदभाई तांबोळी यांच्या वाढदिवसानिमित्त अष्टविनायक महामार्गावर प्रवाशांच्या सुविधेसाठी दिशादर्शक फलक बसविण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. सिद्धटेक-दौंड आणि कुसेगाव-सुपे-मोरगाव या मार्गावर राजमाता अहिल्याबाई होळकर चौकात हे फलक बसवण्यात आले.



गेल्या अनेक महिन्यांपासून या भागात दिशादर्शक फलकांची गरज स्थानिकांनी वारंवार व्यक्त केली होती. या मागणीची दखल घेत फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत हा उपक्रम राबविला.

फलकांचे अनावरण फाउंडेशनचे संस्थापक विनोद कुरुमकर, मार्गदर्शक जुनेद तांबोळी, अध्यक्ष गणेश जाधव, उपाध्यक्ष गौतम पानसरे, सचिव गणेश शितोळे, कार्याध्यक्ष राज मुलाणी आदींच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी व्यापारी संस्थेचे पदाधिकारी नानासाहेब म्हस्के, राजेंद्र पासलकर, दत्ता सोनवणे, तसेच सामाजिक कार्यकर्ते दीपक आव्हाड, बाळासाहेब भंडलकर, वसंत पानसरे, दादा जगताप, आलम दाजीं, प्रवीण पानसरे, सोमनाथ बिनवडे, महंमद बागवान आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रवाशांना विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा अपरिचित भाविकांना या फलकांमुळे मार्गदर्शन होणार असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. पाटस ग्रामविकास फाउंडेशनच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.


सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .